## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## अपिल क्रमांक : के.आर-८२१/२०२२ (तक्रार)

तक्रारकर्ता, श्री.अजित सदाशिव खरात
सदा सुरेख निवास, रो हाऊस बंगला-४
वसंत विहार गार्डन्स, सीटी हॉस्पिटल समोर
अंबरनाथ पूर्व, जि.ठाणे ४२१ ५०१

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ
टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प)
ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०१

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ
टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प)

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ४.४.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३.९.२०२१ | १५.११.२०२१ | २०.१२.२०२१ | २३.१२.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.१८.४.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे." असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ४.४.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय प्राधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" (जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय ठाणे यांनी प्रति मुख्याधिकारी अंबरनाथ नगरपरिषद यांना दि.८.७.२०२१ रोजी क्र.सामान्य/नवि/टे-१/टे-१/L१६२५७४३०८४८७८/कावि-६८४/२०२१ चे अग्रेसित केलेले पत्र शासकीय जागेवर भुमाफीयांमार्फत बांधण्यात आलेल्या सात अनधिकृत गाळयांबाबत २०१६ पासून आजपर्यंत शासनाची फसवणूक करणारे अधिकारी यांचेवर कार्यवाही बाबत माहिती.) "

अ. या पत्रानुसार मुख्याधिकारी यांनी सदर पत्रावर आपले कार्यालयात प्राप्त झाले पासून आजपर्यंत केलेली कार्यवाही. (टिपणी) निर्देश.

आ. तक्रारीनुसार हरी ओम पार्क मैदान सुशोभिकरणाकरीता संदर्भातील विकास कामाकरीता नियुक्त अधिकारी यांना नेमून दिलेले अधिकारी व पद.

इ. कामाबाबतचा ठराव कॉपी.

ई. मैदानाची पाहणी अहवाल.

उ. संदर्भातील बांधकाम विभागाने केलेला पाहणी अहवाल.

ऊ. मैदानाचा १/३ भागच डेव्हलप करणेकरीता केलेला आराखडा यांचे बांधकाम व नगररचना विभाग व सीटी इंजिनिअर ने घेतल्याचे कारण व माहिती.

ऋ. मैदानातील अतिक्रमणाचा बांधकाम विभागाने घेतलेला अतिक्रमण विभागाशी केलेला पाठपुरावा.

ऌ. अतिक्रमण विभागाचे श्री. राजेश तडवी यांनी माझे अतिक्रमण व बांधकाम विभागाने केलेल्या भ्रष्टाचराबाबत मा. मुख्याधिकारींचे दालनात अतिक्रमण काढणे व काम त्वरीत बंद करणेचे दिलेले आदेशानंतर काढलेले आदेश व केलेली कार्यवाही बाबत माहिती.

ऍ. तक्रारीनुसार बांधकाम विभागाने अतिक्रमाणाचा पाहणी अहवाल पहाणीत गाळयांची संख्या.

ऐ. तक्रार पत्रावर केलेली विभागवार कार्यालयीन कार्यवाही.

ए. बांधकाम विभागाने करणारे गाळा मालकाचे नांव गाळयास असलेले इलेक्ट्रीक मीटर मालकाचे नांव गाळयाची टॅक्स पावती.

ऐ. जनतेच्या सुरू असलेल्या कामाबाबत कामाचे ठिकाणी कामाचा ठेका दिल्यापासून कामाबाबत माहिती देणारे फलक कामाचे स्वरूप किती नावामध्ये किती मूल्याचे आहे हे दर्शविणारे फलक यांचे फोटोज व त्यांचे बिले याची माहिती.

ऑ. गार्डन चे प्रवेशद्वारावर उद्यानाशिवाय कोणत्याही व्यक्तीचे नाव लिहीण्याचे बांधकाम विभागाने किंवा मा. मुख्याधिकारी यांनी दिलेले आदेश किंवा परवानगी पत्र.

ऑ. मैदानाचे प्रवेशद्वारावर कै. लालचंद मी. यादर (यादव बिल्डर) यांचे नाव टाकण्याचे कारण व त्यांचा या सुशोभिकरणामध्ये त्यांचे आर्थिक योगदानाची माहिती.

ओ. मैदानाचे प्रवेशद्वारावर ज्या नियमामुळे व जी. आर. नुसार मा. सदस्यांचे नांव लिहिले त्याची प्रत व हे लिहिण्याकरीता परवानगी देणारा अधिकारी यांचे नाव व पद.

औ. गाळामालकाचे नांव असलेली व्यक्ती कै. लालचंद मी. यादव यांचेमधील नाते.

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये " माहिती प्राप्त झालेली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांना सदर माहितीचा तपशिल हा विस्तृत असल्यामुळे माहितीचे अवलोकन करण्याकरीता कळविले आहे.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि२३.१२.२०२१ रोजी सुनावणी घेऊन खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

“जन माहिती अधिकारी तथा संबंधित विभागातील सहा. जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांना १५ दिवसांत माहिती उपलब्ध करून दयावी. सबब, सदरील माहिती अधिकार प्रथम अपिल निकाली काढण्यांत येत आहे.”

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे तक्रार अर्जावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या तक्रार अर्जासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच तक्रारकर्ता यांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी तक्रारकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना प्रथम अपिल आदेशानंतरही कोणतीच माहिती मिळाली नाही. प्रथम अपिलिय अधिकारी यांनी आदेश देऊनसुध्दा तक्रारकर्तांना माहिती प्राप्त न होणे ही अतिशय गंभीर बाब आहे. सबब, तक्रारकर्ता यांना माहिती पुरविण्यास झालेल्या प्रत्येक दिवसाच्या विलंबासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) एवढी शास्ती का करण्यात येऊ नये याबाबत विचारणा करणारी “कारणे दाखवा” नोटीस तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना देणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ३.९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा **लेखी खुलासा त्यांनी दि.६.५.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोगाकडे व्यक्तीशः उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

**२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.६.५.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ एप्रिल, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ
टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प), ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०१
**- यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ
टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प), ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०१ **यांचेमार्फत रवाना.**

**अपिल क्रमांक : के.आर-८२१/२०२२ (तक्रार)**

**तक्रारकर्ता, श्री.अजित सदाशिव खरात**

**सुनावणी दिनांक ६.५.२०२४ (In continuation of order dt. ४.४.२०२४)**

**विवेचन**

तक्रारकर्ता यांनी आयोगाकडे दि.१८.४.२०२२ रोजीच्या अर्जान्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ६.५.२०२४ रोजी पुर्नसुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तथापि, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेपैकी कोणीही आज सुनावणीस उपस्थित नाही. तक्रारकर्ता यांनी अद्यापपर्यंत त्यांना कोणतीच माहिती मिळाली नाही असा युक्तिवाद केला. आयोगाच्या दि.४.४.२०२४ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र. १ मध्ये वरीलप्रमाणे आदेशित केले होते. तथापि, आज सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेपैकी कोणीही उपस्थित नाही व याबाबतचा लेखी खुलासाही आयोगास सादर करण्यात आलेला नाही. सबब, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना आयोगाच्या आदेशानंतरही माहिती दिलेली नाही. सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली व प्रथम अपिलिय अधिकारी यांनी आदेशित केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत विनामुल्य पुरविणे उचित होईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे

**<u>आदेश</u>**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली व प्रथम अपिलिय अधिकारी यांनी आदेशित केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.पंकज पन्हाळे, उप अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी तक्रारकर्ता यांना प्रथम अपिल आदेशानंतर माहिती पुरविली नसल्याबाबतचा कोणताही समर्थनीय लेखी खुलासा आयोगाच्या दि.४.४.२०२४ रोजीच्या आदेशानंतरही सादर केलेला नाही. यास्तव त्यांना दि.४.४.२०२४ च्या आदेशान्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर रु. २५,०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून **०३** मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र.००७०, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थ संकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करावी. याबाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल **मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ** यांनी आयोगास सादर करावा.

३. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ६ मे, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना,**

१. सचिव, राज्य माहिती आयोग (मुख्यालय), १३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर,मुंबई ४०० ०३२.
२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, कोंकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
३. मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प) ४२१ ५०१.
४. आहरण व संवितरण अधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प) ४२१ ५०१.
५. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. पंकज पन्हाळे, उप अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ, टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प) ४२१ ५०१
**<u>- यांना प्रत</u>** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ, टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प) ४२१ ५०१ **<u>यांचेमार्फत रवाना.</u>**

**( In Continuation of order dt.०६.०५.२०२४)**

**<u>विवेचन</u>**

उपरोक्त दि.०६.०५.२०२४ रोजीच्या आदेशान्वये आयोगाने विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांना तक्रारकर्ता यांना १५ दिवसात माहिती पुरविणेबाबत आदेशीत केले होते. तथापि विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार तक्रारकर्ता यांना माहिती पुरविलेली नाही. त्यामुळे तक्रारकर्ता यांनी आयोगाकडे दि.१०.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये लेखी अर्ज सादर केला आहे. सदर अर्जामध्ये त्यांनी असे नमूद केले की, त्यांच्या तक्रारीवर मा.कोकण खंडपीठाने दिनांक

०४.०५.२०२४ व दिनांक ०६.०५.२०२४ रोजी दिलेल्या आदेशानुसार अंबरनाथ नगरपरिषद, बांधकाम विभागाने १५ दिवसांत संपूर्ण माहिती द्यावे असे आदेश होते. पण आज ८ महिने झाले तरी त्यांना माहिती मिळालेली नाही.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी तक्रारकर्ता यांना आयोगाच्या आदेशानंतर अद्यापही माहिती दिलेली नसल्याने, याप्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (३) अंतर्गत चौकशी करणे योग्य होईल, असे आयोगाचे मत आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तक्रारकर्ता यांना आयोगाच्या दि.०६.०५.२०२४ रोजीच्या आदेशानंतरही माहिती न दिल्यामुळे याप्रकरणात चौकशीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.पंकज पन्हाळे, उप अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांची आयोगासमोर उपस्थिती आवश्यक आहे, या चौकशी करिता उपस्थित राहणेस्तव उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ यांनी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.पंकज पन्हाळे, उप अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८(३)(क) अन्वये तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता अनुषंगाने आयोगास प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन पुढील सुनावणीस उपस्थित राहणेबाबत समन्स काढण्यात यावे. सदर समन्स ची बजावणी अंबरनाथ पोलीस स्टेशन, अंबरनाथ तसेच पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे मार्फत करण्यात यावी.

२. प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी दि.०८.०९.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०४ ऑगस्ट, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

उपसचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
कोकण खंडपीठ, कोकण भवन, ५ वा मजला,
रु.न.५२७, ५२८, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. पंकज पन्हाळे,
उप अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद,
अंबरनाथ, टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प.) ४२१ ५०१.

राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ

## सुनावणी दिनांक ०८.०९.२०२५ (In continuation of order dt. ०४.०८.२०२५)

## विवेचन

उपरोक्त दि.०४.०८.२०२५ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानंतरही माहिती दिलेली नसल्यामुळे, त्यांना समन्स बजावण्याचे आदेश पारित केले होते. त्याअनुषंगाने सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ०८.०९.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.पंकज पन्हाळे, उप अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगर परिषद, अंबरनाथ उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.पंकज कैलास पन्हाळे, उप अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी त्यांचा खुलासा सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना रु.२५,०००/- इतका दंड लावण्यात आलेला असून, सदर रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. तथापि ते सदर कार्यालयात विद्यमान जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत नाहीत. सदर कार्यालयात विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.संजय ज्ञानेश्वर कुंभार, नगर अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ हे कार्यरत आहेत. ते आजच्या सुनावणीस अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. आयोगाने स्पष्ट आदेश दिल्यानंतर सुध्दा तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कार्यवाही केल्यानंतरसुध्दा अद्यापपर्यंत अपिलार्थी यांना माहिती प्राप्त

झालेली नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.संजय ज्ञानेश्वर कुंभार, नगर अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून याबाबतचा खुलासा सादर करणे योग्य राहील. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानंतरसुध्दा तक्रारकर्ता यांना माहिती पुरविली नसल्यामुळे, तक्रारकर्ता यांना माहिती प्राप्त होण्यास विलंब झाला आहे. या विलंबासाठी मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी तक्रारकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(८)(ख) अंतर्गत रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) इतकी नुकसान भरपाई का देण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.संजय ज्ञानेश्वर कुंभार, नगर अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी आयोगाच्या दि.०६.०५.२०२४ रोजीच्या आदेशानुसार **तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही**. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. आयोगाच्या आदेशानंतरही विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना माहिती पुरविलेली नाही. तक्रारकर्ता यांना माहिती मिळविण्यासाठी जो त्रास सहन करावा लागला त्याची भरपाई म्हणून मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी तक्रारकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(८)(ख) अंतर्गत रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) इतकी नुकसान भरपाई का देण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०९.०९.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०८ सप्टेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

मुख्याधिकारी,
अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ,
टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प.) ४२१ ५०१.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. संजय ज्ञानेश्वर कुंभार,
नगर अभियंता, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद,
अंबरनाथ, टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प.) ४२१ ५०१.